‘‘महाराष्ट्रातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्राध्यापकांच्या माहितीविषयक गरजा व माहिती शोध प्रक्रियेचा अभ्यास’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आंतरविद्याशाखे अंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच.डी पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

समाधान वसंत बेहेरे

मार्गदर्शक

डॉ. गणपत रामसिंग पवार
ग्रंथपाल
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,

एप्रिल, २०२२

‘‘महाराष्ट्रातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्राध्यापकांच्या माहितीविषयक गरजा व माहिती शोध प्रक्रियेचा अभ्यास’’

प्रस्तावना (Introduction)

समाजाच्या सर्व क्षेत्रातील विकासाकरिता ‘माहिती’ (Information) हा एक मूलभूत घटक आहे. मानवाच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यसाठी ही माहितीची नितांत गरज लागते. माहितीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. माहिती ही मानवाची निर्मिती आहे आणि ती अनुभव, निरीक्षण, विचारांची देवाण—घेवाण, लेखन आणि वाचन यातून प्रवाहित होत असते. आजचे आर्थिक जीवन व जीवनमान हे संशोधनावर आधारित आहे. नवीन माहिती आता कमी वेळेत प्रसारित होत आहे. माहितीचा प्रसार आणि प्रचार मोठया प्रमाणात वाढला आहे. माहिती मोठया प्रमाणावर सातत्याने प्रसिध्द होत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव आंतरजाल यामुळे ‘माहितीचा परिस्फोट’ झाला आहे. त्यामुळे माहितीचा पुरवठा वाढला आहे. विविध प्रलेखातून उदा. ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे, संशोधन पेपर, टिपा, विवरणे, सार, निर्देश, भाषणे, परिषद वृत्ते तांत्रिक अहवाल इत्यादी मधून माहिती प्रसिध्द होत आहे. त्यामुळे संशोधकांना वारंवार नवनवीन माहितीची गरज त्यांच्या संशोधनासाठी भासू लागली आहे.

‘ग्रंथालय’ हे सर्व संसाधने पुरविण्याचे व संशोधकांच्या गरजा पूर्ण करण्याचे ठिकाण समजले जाते. ग्रंथपालांना सातत्याने वाढत जाणारे ज्ञान, वाचन साहित्य आणि वाचक यांचा विचार करुन कार्यरत रहावे लागते. आपली कार्ये प्रभावीरित्या, कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी ग्रंथपाल आपले व्यावसायिक ज्ञान व इतर साधनांद्‌वारे विविध माहिती सेवा वाचकांना पुरवित असतो. वाचकांना कोणताही निर्णय घेण्यासाठी तसेच समस्यांचे निराकरण करण्यासाठी माहितीची नितांत आवश्यकता असते.

‘निर्णय घेण्यासाठी उपयुक्त असणारे ज्ञान म्हणजेच माहिती होय.’

“Information is any stimulus that reduces uncertainty” (Shannon & weaver 1949)

महिती हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. संशोधकांना त्यांना हवी असणारी माहिती वेगवेगळया प्रकारची असू शकते.

प्राध्यापकांना विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी संशोधन करण्यासाठी ज्ञानात वाढ करण्यासाठी, संदर्भ, उदाहरणे देण्यासाठी नवनवीन माहितीची गरज असते. त्यासाठी ते ग्रंथालयावर अवलंबून असतात. महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून अशा माहितीची गरज कितपत पूर्ण होत हया अनुषंगाने प्राध्यापकांच्या माहितीविषयक गरजांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. तसेच प्राध्यापकांना ते करीत असलेल्या संशोधनात ग्रंथालये कितपत मदत करतात. याचाही अभ्यास होणे आवश्यक आहे.

ज्ञानात होणारी वाढ व तंत्रज्ञानात होणारी प्रगती यांमुळे वाचक अभ्यासक प्राध्यापक आणि संशोधक यांच्या माहिती गरजांमध्ये विविधता आली आहे. ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या सेवा—सुविधांमुळे वाचकांची व्याप्ती वाढून ग्रंथालय म्हणजे 'माहिती केंद्र'च बनले आहे.

ज्ञान निर्मिती करणे हा संशोधनाचा एक हेतू आहे. सध्या, जगातील सर्वच देश ज्ञानाधिष्ठित समाज निर्मितीसाठी प्रयत्नशील आहेत. ज्ञानाधिष्ठित समाज निर्मितीसाठी संशोधन आवश्यक आहे. संशोधन हाच ज्ञानाधिष्ठित समाज निर्मितीचा पाया असणार आहे. ज्ञान निर्मितीसाठी आणि पर्यायाने ज्ञानाधिष्ठित समाज निर्मितीसाठी संशोधन आवश्यक असल्यामुळे संशोधनाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळेच 'संशोधन' ही आता एक स्वतंत्र ज्ञानशाखा झाली आहे. शिवाय सर्वच विषयांच्या अभ्यासक्रमांमध्ये 'संशोधन पध्दती' या स्वतंत्र विषयाचा समावेश करण्यात येत आहे.

'संशोधन' हा शब्द इंग्रजी भाषेतील 'Research' या इंग्रजी शब्दासाठी मराठी पर्यायी शब्द आहे. वेबस्टारच्या शब्दकोषानुसार 'संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान नवीन तथ्ये अथवा तत्त्वे शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये अथवा तत्त्वे यांचे पुन्हा:पुन्हा परिक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक पध्दतशीर अभ्यास होय.' संशोधन हे नवीन ज्ञानाचे संपादन करणे तसेच जुन्या ज्ञानाचे परिक्षण करण्यासाठी केले आहे. त्यामध्ये आणखी नवीन किंवा जे अद्यापही अज्ञान आहे ते शोधून काढण्यासाठीचे प्रयत्न होय.

संशोधनातून अनेक दुसऱ्या अनपेक्षित समस्या निर्माण होत असताना आणि त्याकरीता पुन्हा:पुन्हा संशोधन करावे लागतात. अर्थातच संशोधन कार्य

कधीच न संपणारी प्रक्रिया आहे. संशोधन ही एक बौध्दिक प्रक्रिया आहे. त्यातून जुन्या ज्ञानातील उणीवा दूर करुन ज्ञानात सतत नवीन भर घालण्यात येत असतात.[१]

सदर संशोधनात **'महाराष्ट्रातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्राध्यापकांच्या माहितीविषयक गरजा काय आहे तसेच माहिती शोध प्रक्रियेचे स्वरुप काय आहे.'** त्यांची पूर्तता ग्रंथालयातून केली जाते का? या सर्व प्रश्नांची उकल होईल असा संशोधकाला विश्वास आहे.

संशोधन विषयाची निवड (Reason for the Selection of topic)

संशोधन समस्या लक्षात येण्यासाठी संशोधकाकडे 'शोधक' दृष्टी असणे गरजेचे आहे. संशोधन समस्या मात्र संशोधकाच्या आसपास असते. परंतु ती ओळखण्यासाठी तिची जाणीव होण्यासाठी, संशोधन समस्या लक्षात येण्यासाठी संशोधकाचे ज्ञानचक्षु सजग असले पाहिजेत. त्याने दैनंदिन घटनांकडे चिकित्सकतेने निरीक्षण केले पाहिजे. जसे, पुढील प्रकारच्या बातम्या, घटना, चर्चा यांच्या निरीक्षणातून संशोधन समस्येची जाणीव होऊ शकते. संशोधनासाठी विषय उपलब्ध होऊ शकतो.

संशोधनासाठी निवडावयाचा विषय संशोधकाच्या आवडीचा असला पाहिजे. ज्या विषयाबाबत संशोधकास अधिक आकर्षण, आवड आहे तो विषय संशोधकाने संशोधनासाठी निवडला पाहिजेत. संशोधन समस्या नवीन असावी. ज्या विषयावर अद्याप संशोधन झालेले नाही, असा विषय संशोधनासाठी निवडणे योग्य असते. प्रस्तावित संशोधन विषय प्रचलित तसेच भविष्यकाळात उपयुक्त ठरणारे असले पाहिजेत. संशोधन समस्येच्या स्वरुपानुसार संशोधनासाठी विविध प्रकारची साधने, उपकरणे आणि सुविधा आवश्यक किंवा उपलब्ध होऊ शकतील असाच विषय संशोधनास निवडावे. संशोधकाकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ, वेळ आणि आर्थिक साधने विचारात घेऊनच संशोधनाची व्याप्ती निश्चित करावी लागते. संशोधन विषयासाठी माहिती सहजपणे उपलब्ध होऊ शकेल असा विषय निवडावा. तसेच संबंधित घटकांकडून सहकार्य मिळेल अशा स्वरुपाचे विषय निवडावा लागतो. संशोधकास संशोधन कार्यामुळे सन्मान,

प्रतिष्ठा प्राप्त होऊ शकते. संशोधनाचा विषय निवडताना देशाची, समाजाची गरज महत्वाची असते. संशोधनात संशोधन विषय ही एक महत्त्वाची बाब आहे.[२]

संशोधनाचे शीषर्क (Statement of Problem)

संशोधकाने संशोधनासाठी **''महाराष्ट्रातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्राध्यापकांच्या माहितीविषयक गरजा व माहिती शोध प्रक्रियेचा अभ्यास''** या विषयाची निवड केली आहे.

व्याख्या संज्ञा, संकल्पना Explanation of Key Content

१. कला, वाणिज्य, विज्ञान शाखा :

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक धोरणानुसार किंवा आकृतिबंधानुसार उच्च माध्यमिक १० + २ (HSC) स्तर नंतर येणारा शैक्षणिक स्तर म्हणजे वरिष्ठ महाविद्यालयीन स्तर होय. कला, वाणिज्य, विज्ञान या वरिष्ठ महाविद्यालयातील शाखा आहेत.

२. प्राध्यापकः

वरिष्ठ महाविद्यालयात (प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष) वर्गांना अध्यापन करणारे शिक्षक हे प्राध्यापक असतात. विद्यापीठ अनुदान आयागे (UGC) नियमानुसार प्राध्यापकांना पदवीत्तर पदवी एम. फिल, पीएच.डी., सेट, नेट इ. शैक्षणिकअर्हता धारण करणे गरजेचे असते.

३. माहितीः

माहिती म्हणजे विशिष्ट प्रकारचा डेटा होय. जी संख्यात्मक, गुणात्मक तसेच विस्तृत स्वरुपात उपलब्ध होते.

४. माहितीविषयक गरजाः

संबंधित वर्गाच्या अभ्यासक्रमानुसार निर्धारित केलेल्या घटकांविषयक आवश्यक ती माहिती व त्याविषयक गरजा उदा. निर्धारित अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना पाठयपुस्तकांची गरज असणे.

५. माहिती शोध प्रक्रिया:

प्राध्यापकांच्या माहितीविषयक गरजा पुर्ण करण्यासाठी माहिती शोध प्रक्रियेचा (Information Seeking Behaviour) अवलंब केला जातो.

संशोधन विषयाचे महत्त्व: (Importance of study)

शिक्षण प्रक्रियेत ग्रंथालयांना अनन्यसाधारण महत्व आहे. युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशनचे (१९४९) अध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या मतानुसार विद्यापीठातील सर्व कार्यांचा केंद्रबिंदू ग्रंथालय आहे. संशोधनामध्ये आणि शैक्षणिक उपक्रमामध्ये महाविद्यालयीन ग्रंथालये महत्वाची भूमिका बजावते.

ग्रंथालये संकल्पनेचे अस्तित्व २५ शतकापुर्वीचे आहे, असे मानले जाते. ग्रंथालये महत्व हे सर्वसामान्य आहे. ती एक सामाजिक संख्या आहे, ज्यात ज्ञानाचे पेव दडलेली आहे. ग्रंथालयास संस्कृतीचे मंदिर असेही म्हटले जाते.[६]

आजच्या युगात 'माहिती' या शब्दाला अत्यंत महत्त्व प्राप्त होत आहे. आजचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. विविध माध्यमातून माहिती मिळवून ज्ञानात भर घालण्यासाठी माहितीची गरज असते. माहिती असणारा समाज प्रगल्भ समजला जातो. मानवाची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, सर्वांगिण विकासाकरिता माहिती महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

समाजाचा, राष्ट्राचा, देशाचा या विश्वाचा सर्वतोपरी विकास या माहितीवरच अवलंबून असतो. परिणामी माहितीला 'मूल्य' प्राप्त झाले आहे सर्वच क्षेत्रात माहितीचा प्रचार व प्रसार वाढत चालला आहे.

प्राध्यापकांना संशोधनासाठी तसेच विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी संदर्भ सांगण्यासाठी, ज्ञानात भर घालण्यासाठी तसेच स्वत:चा व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी माहितीची आवश्यकता असते.

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून निघणारे निष्कर्ष, शिफारशी यांचा अभ्यास केल्यानंतर त्याच पातळीवरील इतर राज्य, देश पातळीवरील वरिष्ठ महाविद्यालय ग्रंथालयातील प्राध्यापक, वाचकांच्या माहितीविषयक गरजांची उकल होणार आहे.

वाचन साहित्याचा आढावा (Review of Literature)

संशोधनास योग्य दिशा मिळण्यासाठी तसेच संशोधन प्रबंधात माहिती संकलित करावी याची पूर्व कल्पना यावी या हेतूने पूर्व साहित्याचा शोध घेण्यात आला आहे. संशोधक संशोधनासाठी संशोधन प्रबंध, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, नियतकालिकातील लेख इत्यादीच्या माध्यमातून वाचन साहित्याचा आढावा घेणार आहे.

१. Khamkar R.D., (2014), *"An Evaluative study of information seeking behaviour of the faculty members of LIS education in Maharashtra State"*, Ph.D. thesis, Shivaji University : Kolhapur
२. Kamble, Veena, (2017) *"Information seeking behaviour of Social Scientists in Marathwada",* Ph.D. thesis, Dr. Babasheb Marathwada University: Aurangabad
३. झाडबुके, सुनिता शंकर, (२००७—२००८), *''सांगोला महाविद्यालय येथील शिक्षकांच्या वाचन सवयींचा अभ्यास'',* अप्रकाशित एम. लिब., प्रकल्प, य.म.च. मुक्त विद्यापीठ: नाशिक
४. Corbo, Toni, (Apr.-Sept. 2009), *"The International Information and Library review"*, Elsevier Ltd. : U.K.

   प्रस्तुत नियतकालिकातील कर्नाटकातील तांत्रिक ग्रंथालये व व्यवस्थापन ग्रंथालये यांची माहिती दिली आहे. ग्रंथालयामध्ये सध्या चालू असलेली तांत्रिक सेवा त्याचबरोबर माहिती विषयक गरजा यांची सविस्तर माहिती सांगितली आहे.

५. Shukla, V.K., (January-April 2005), *"Inclination of Scientists towards E-Information in the Libraries, C.S.I.R. Institutions of Lukhnow",* Herald of Library Science: Lukhnow P.53-59

   प्रस्तुत लेखात शुक्ला यांनी Council for Scientific and Industrial Research या संस्थेतील शास्त्रज्ञांच्याकडून लायब्ररीतील इ—इन्फॉर्मेशनच्या वापराचा कल, शास्त्रज्ञांच्या माहितीविषयक गरजा याविषयी सविस्तर माहिती वर्णन केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objective of Research)

संशोधनाचा पाया हा संशोधनाच्या उद्दिष्टांवर आधारित असतो. कारण संशोधन ही जाणीवपूर्वक हेतुपुरस्पर व नियोजनपुर्ण असावे लागते. संशोधन हे निवडलेल्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने पूर्ण करावे लागते. उद्दिष्टे स्पष्ट असतील तर संशोधनास अचूक दिशा मिळते आणि त्या अनुषंगाने योग्य ती माहिती संशोधकास करता येते.

उद्दिष्टांद्वारे संशोधन समस्या अधिक सुस्पष्ट करता येते. त्याकरीता उद्दिष्टे सुस्पष्ट असावी व त्यामध्ये कोणतीही संदिग्धता नसावी. उद्दिष्टदर्शकच्या एका वाक्यामध्ये संशोधन समस्येच्या दोन वा अधिक पैलूंचा समावेश नाही करावेत. उद्दिष्ट पूर्तीसाठी कोणकोणत्या कृती करणे आवश्यक आहे याचा उल्लेख उद्दिष्टांमध्ये असावेत.[३]

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने खालील उद्दिष्टे निर्धारित केलेली आहेत.

१. महाराष्ट्रातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्राध्यापकांच्या माहितीविषयक गरजांचे स्वरुप जाणून घेणे.
२. प्राध्यापकांच्या माहिती शोध प्रक्रियेचा अभ्यास करणे.
३. प्राध्यापक माहिती शोध प्रक्रियेबाबत कोणकोणत्या आधुनिक साधनाचा वापर करतात याचा आढावा घेणे.
४. सदर प्राध्यापकांच्या माहिती शोध प्रक्रियेमध्ये येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.
५. प्राध्यापकांच्या माहिती शोध प्रक्रियेबाबत त्यांच्या जागृततेचा (Awerness) अभ्यास करणे.
६. ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या परंपरागत तसेच आधुनिक माहिती सेवांविषयी प्राध्यापकांच्या शिफारशी जाणून घेणे.
७. सदर अभ्यासाच्या निष्कर्षावर आधारित सूचना करणे.

संशोधनाची गृहितके (Hypothesis of Research)

गुड आणि हॅट यांच्या मते, ‘गृहितकृत्य ही अशी मान्यता आहे की, जी सत्य सिध्द करण्यासाठी तिचे प्रायोगात्मक परिक्षण केले जावू शकते आणि पुढील संशोधनासाठी ते उपयुक्त असते.[४]

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खालील गृहितके मांडली आहेत.

१. महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालय ग्रंथालयातून प्राध्यपकांच्या माहितीविषयक गरजांची पुर्तता होते.

२. महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयातून कला, वाणिज्यशास्त्र शाखेतील प्राध्यापकांच्या माहितीविषयक गरजांची पूर्तता विविध सेवांच्या माध्यमातून केली जाते. उदा. CAS, SDI, SMS etc.

३. ग्रंथालयामार्फत प्राध्यापकांच्या माहितीविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

४. सर्वच ग्रंथालयात पुरेशा प्रमाणात संदर्भ ग्रंथाची व माहिती साधनांची उपलब्धता आहे.

संशोधन पध्दती (Research Methodology)

कोणत्याही विषयाचा विकास हा त्या विषयाच्या संशोधनावर अवलंबून असतो. संशोधन म्हणजे सत्याचा किंवा अज्ञानाचा शोध व संशोधन पध्दती म्हणजे तर्कशुध्द विचार करण्याचे तंत्र असून त्या तंत्राच्या आधारे समस्या सिमित करणे होय.

संशोधनाची व्याख्या

डॉ. पी.एल. भांडारकर: ‘नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित स्वीकृत निष्कर्ष व सिध्दांत पुन्हा तपासून पाहण्यासाठी केलेली सखोल चिकित्सक चौकशी किंवा प्रयोग म्हणजेच संशोधन होय.[५]

जे. डब्ल्यु, बेस्ट : ‘संशोधन ही अशी अधिक व्यवस्थित क्रियात्मकता आहे की जी नव्याचा शोध घेते व संघटित ज्ञानाला अधिक विकसित करते.’[६]

सी.ए.मोझर: ‘सामाजिक घटना व सामाजिक संमस्यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करुन घेण्याच्या उद्देशाने केलेले सुत्रबध्द प्रयत्न म्हणजे संशोधन होय.[७]

संशोधनाचा विषय, माहितीचे स्वरुप व उद्‌दिष्टे यांवर संशोधन पध्दतीची निवड अवलंबून असते. संशोधन हे शास्त्रीय पध्दतीने होणे आवश्यक आहे. शास्त्रीय संशोधन पध्दती तीन आहेत.

१) वर्णनात्मक संशोधन पध्दती (Descriptive Research method)
२) ऐतिहासिक संशोधन पध्दती (Historical Research method)

३) प्रायोगिक संशोधन पध्दती (Expermental Research method)

'एखाद्या स्थितीचा, व्यक्तीचा किंवा गटांच्या वैशिष्टयांच्या अचूक व वस्तुस्थिती निदर्शक वर्णन करणे हे वर्णनात्मक वैशिष्टयांचे अचूक व निपक्षपाती वर्णन हे ज्यांचे उद्दिष्ट असते. त्यालाच वर्णनात्मक संशोधन पध्दती म्हणतात.[८]

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope & Limitation of Research)

संशोधनविषयाचा विस्तार, सर्वसमावेशकता भौगोलिक व कालखंड यांचे आकारमान इ. घटक संशोधन विषयाची व्याप्ती ठरवत असतात. समस्येचे निरसन करण्यासाठी संशोधकाला त्या विषयाची व्याप्ती व काल मर्यादा ठरवावी लागते. प्रस्तुत संशोधनात विषयाची व्याप्ती निश्चित करण्यात आली आहे. संशोधकाने आपल्या विषयाचे संशोधन करीत असताना आपल्या विषयाचे संशोधन हे वेळेतच पूर्ण करावयास हवे. त्यासाठी त्याचे पूर्वनियोजन करणे आवश्यक आहे. संशोधन विषयाचे भौगोलिक आकारमान व गोळा करावयाच्या माहितीचा कालखंड म्हणजे संबंधित विषयाची व्याप्ती होय. संशोधन जर सखोल व दर्जेदार बनवयाचे असले तर संशोधन विषयाची व्याप्ती मर्यादित असणे गरजेचे आहे.[८]

१. संशोधनाची व्याप्ती ही 'महाराष्ट्रातील कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील प्राध्यापकांच्या माहिती विषयक गरजा व माहिती शोध प्रक्रियेबाबत सिमित आहे.

२. सन २००० पर्यंतच्या निवडक अनुदांनित वरिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्राध्यापकांच्या माहितीविषयक गरजा व माहिती शोध प्रक्रियेचा अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे.

३. महाराष्ट्रातील वरिष्ठ अनुदानित महाविद्यालयामधून प्रत्येक जिल्हयातील पाच वरिष्ठ महाविद्यालय म्हणजेच एकूण १८० वरिष्ठ महाविद्यालयाची निवड प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात आली आहे.

नमुना निवड (Sampling Technique)

संशोधनास अनुरुप वस्तुनिष्ठ दर्जा प्राप्त करण्यासाठी सर्वंकष माहिती गोळा करावी लागते. संशोधनाच्या प्रक्रियेत जी माहिती गोळा करावी लागते आणि ज्या माहितीच्या विश्लेषणानंतर संशोधक निष्कर्षाप्रत पोहचतो ती माहिती त्या गोष्टीसंबंधी असते. त्या गोष्टी माहिती गोळा करण्याचे लक्ष ठरतात.

नमुना निवडीच्या संदर्भात “Population” चा अर्थ लोकसंख्या ऐवजी लक्ष्यगट असा घेतला जातो.

“A Population is the collection of all itesm, objects, things or people about which information is desired for the solution of a problem.”

अर्थातच लक्ष्यगट म्हणजे संशोधनासाठी लागणारी माहिती ज्यांच्याकडून किंवा जिथून मिळवायची ते लोक, संस्था, साहित्य इत्यादी. संशोधनाच्या लक्ष्यसमूह जर लहान आहे तर एकूण लक्ष्यसमूहाची नमूना म्हणून निवड करु शकतो पण जर लक्ष्यसमूह आकाराने मोठा व भौगोलिक दृष्टया विखुरलेला असेल तर माहिती संकलनासाठी नमुना निवड पध्दतीचा वापर करावा लागतो.

‘शितावरुन भाताची परीक्षा’ अशी म्हण समाजात रुढ आहे. हा एक नमुना निवडीचा प्रकार आहे, भाताची परीक्षा करण्यासाठी प्रत्येक शिताची परीक्षा घेणे गरजेचे नाही, तर भाताचा एक शित सुध्दा वस्तुस्थितीची कल्पना देवू शकते. आपल्या दैनंदिन जीवनात कळतनकळत नमूना निवडीवरुनच काही निष्कर्ष आपण मांडत असतो.[९]

व्याख्या:

बोगार्डस् ‘‘एकपूर्व निर्धारित योजनेनुसार एककांच्या एका समूहामधून एक निश्चित प्रतिशत निवडणे म्हणजे नमूना निवड होय.[१०]

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्राध्यापक वाचक, ग्रंथपाल यांच्याकडून माहिती गोळा करण्यात येणार आहे. लक्ष्यसमूह मोठा असल्याने त्यातील किमान १८० अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील संपूर्ण प्राध्यापकांची निवड करण्यात येणार आहे.

माहिती संकलन तंत्र व साधने (Data Collections Techniques & Tools)

वास्तविक पाहता संशोधनाची चौकट माहितीच्या आधारावरच उभी केली जाते. ज्ञानप्राप्ती करणे हे संशोधनाचे उद्दिष्ट असते. संशोधनात एखादा विषय निश्चित झाला की त्या अनुषंगाने माहिती संकलित करावी लागते अशी माहिती नेहमी वस्तुनिष्ठ व विश्वसनीय असावी लागते. माहिती संकलित करणे ही एक शिस्तबध्द प्रक्रिया आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक **प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची व निरीक्षण तंत्राचा** उपयोग करणार आहे. तर ग्रंथपालांकडून मुलाखत, अनुसूचीद्वारे तसेच प्राध्यापक वाचकांच्याकडून प्रश्नावलीद्वारे माहिती संकलित करणार आहे. तसेच ठराविक उत्तरदात्याकडून प्रश्नावलीची विश्वासर्हताही तपासून पाहणार आहे. व ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेट देवून **निरीक्षण तंत्राद्वारे** माहिती संकलित करणार आहे.

माहितीचे विश्लेषण व सादरीकरण (Information Analysis & Presentation)

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने गोळा केलेली अचूक, वस्तुनिष्ठ माहिती निवडून सत्यता शोधून तिचे योग्य प्रकारे वर्गीकरण व सांकेतीकरण करुन त्या माहितीचे विश्लेषण केले जाणार आहे.

माहिती सादरीकरण (Presentation)

तक्ता, आकृत्या, नकाशे, आलेख, छायाचित्रे यांचा वापर करण्याचे निश्चित केले आहे. कारण माहितीचे सादरीकरण करताना एखादा गुंतागुतींचा तपशील सांख्यिकीय आलेख व चित्राद्वारे स्पष्ट केल्यास वाचकांना आकलनास सुलभ होतो.

प्रकरणाची रुपरेषा (Tentative Chapters Scheme)

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : संबधित विषयासंबंधी माहितीचे संकलन

प्रकरण चौथे : संकलित माहितीचे विश्लेषण

प्रकरण पाचवे : निष्कर्ष व शिफारशी

संदर्भग्रंथ सूची

१) कुंभार राजेंद्र, (२०१५), *'ग्रंथपाल आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती',* युनिव्हर्सल प्रकाशन: पुणे

२) कऱ्हाडे बी.एम., (२००७), *'शास्त्रीय संशोधन पध्दती',* पिंपळापूरे ॲण्ड कं. प्रकाशन: नागपूर

३) कऱ्हाडे बी.एम., (२००७), *'शास्त्रीय संशोधन पध्दती',* पिंपळापूरे ॲण्ड कं. प्रकाशन: नागपूर

४) कऱ्हाडे बी.एम., (२००७), *'शास्त्रीय संशोधन पध्दती',* पिंपळापूरे ॲण्ड कं. प्रकाशन: नागपूर

५) कऱ्हाडे बी.एम., (२००७), *'शास्त्रीय संशोधन पध्दती',* पिंपळापूरे ॲण्ड कं. प्रकाशन : नागपूर

६) कुंभार राजेंद्र, (२०१५), *'ग्रंथपाल आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती',* युनिव्हर्सल प्रकाशन:पुणे.

७) कुंभार राजेंद्र, (२०१५), *'ग्रंथपाल आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती',* युनिव्हर्सल प्रकाशन: पुणे.

८) मुळे व उमाठे, (१९८७), *'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे',* महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ: नागपूर.

९) निकोसे सत्यप्रकाश, (२००७), *'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती',* प्रज्ञा प्रकाशन: नागपूर.

१०) फडके द.ना., (२००८), *'ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण',* फडके प्रकाशन: कोल्हापूर.

११) आगलावे नागपूर प्रदिप, *'सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे',* श्री साईनाथ प्रकाशन: नागपूर.

१२) नरगुंदे रेवती, (२००२), *'ग्रंथालय आणि सामाजिक विकास',* युनिव्हर्सल प्रकाशन: पुणे.

१३) पारखी गंगाधर रघुनाथ, (२००१), *'ग्रंथालय शास्त्र परिचय युनिव्हर्सल'* प्रकाशन: पुणे.

१४) नरगुंदे रेवती, (१९९६), *'प्रलेखन आणि माहितीशास्त्र'*, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.

१५) Kothari C.R. (2011), '*Research Methodology Methods & technique*', Age International Publisher : Delhi, New.

१६) पाटील वा. भा., (१९९८), *'संशोधन पध्दती'*, मंगेश प्रकाशन, नागपूर.

१७) काचोळे, दा.धो., (२००५), *'समाजशास्त्रातील संशोधन पध्दती'*, कैलास प्रकाशन: औरंगाबाद.

१८) http://shodhganga.inflibnet.ac.in/

१९) http://nlist.inflibnet.ac.in/

संशोधक

बेहेरे समाधान वसंत

मार्गदर्शक

डॉ. पवार जी. आर.

ग्रंथपाल

शिवाजी महाविद्यालय, हिंगोली